# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/०५/२०२४ (गुरूवार) दुपार


### अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीतांना केले अटक

पोस्टे सावनेर अंतर्गत दिनांक ०९/०५/२०२४ रोजी सावनेर ते खापा रोडवरील उडाण पुलाचे खाली ट्रक मध्ये TP पेक्षा जास्त रेती २ ब्रास पेक्षा अतिरिक्त रेती १.८० ब्रास चोरटया रेतीने भरुन अवैधरीत्या वाहतूक करताना मिळून आल्याने सदर ट्रक मा. तहसीलदार सावनेर यांचे कडून verify करणे साठी पोस्टे ला detain करून ठेवले व त्यांचे रिपोर्ट प्राप्त झाल्याने आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. आरोपीतांविरूद्ध पोस्टे सावनेर येथे अप क्र. ४८२/२४ कलम ३७९, १०९ भादंवी सहकलम ४८(८) महा. जमीन महसूल अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

TP पेक्षा जास्त अतिरीक्त रेती चोरटया रीतीने वाहनचालक यांना परस्पर पैसे देवुन रेती विक्री करीत असल्याचे व सदर गुन्हा हा संघटीतरीत्या एखादया व्यक्तीचे आधारकार्डचा वापर करून त्याचे नावाने बुकींग करत असल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाल्याने रामटेक येथुन **आरोपी नामे– १) दिपक उर्फ अमितकुमार केदारनाथ यादव वय ४१ वर्ष, रा. खमगाव जि. बुलढाणा २) सचिन जुगलकिशोर शर्मा वय ४५ वर्ष, रा. खमगाव जि. बुलढाणा** यांना ताब्यात घेवुन गुन्हयाबाबत विचारपुस केली असता आरोपीतांनी गुन्हयाची कबुली दिली. आरोपीतांकडुन १) टाटा हायवा ट्रक क्र. एम एच–४०/ए के–८५८५ किंमती १०,००००००/–रू. २) ट्रकमध्ये अतिरीक्त भरून असलेली रेती १.८० ब्रास किंमती १०,८००/– रू. ३) ट्रक चालक धर्मराज रंगारी यांचेकडे रेडमी कंपनीचा मोबाईल किंमती ४०००/–रू. ४) ट्रक मालक प्रज्वल गोखे याचेकडील विवो कंपनीचा मोबाईल किंमती ३०००/–रू. ४) आरोपी दीपक यादव यांचेकडील ओपो कंपनीचा मोबाईल ४०००/–रू. रेती भरण्याकरीता किरायाने घेतलेली जेसीबी क्र. एम एच–४०/पी–३२८५ किंमती १२,००००००/– रू. ५) आरोपी सचिन शर्मा याचेकडुन विवो कंपनीचा मोबाईल किंमती ३०००/–रू. आरोपी पराग गुप्ता याचेकडुन ॲपल आयफोन १३ प्रो मॅक्स मोबाईल किंमती २०,०००/–रू. असा एकुण २२४४८००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील गेडाम, पोहवा माणिक शेरे, पोशि नितेश, निसार यांनी पार पाडली.

# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
# वाहनासह एकुण २०,१५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १६/०५/२०२४ रोजी पोस्टे रामटेक येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, १२ चक्का ट्रक क्र. एम. एच.—४०/सी एस— ७६६५ मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) ट्रकमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा मनसर पावर हाउसच्या समोर रामटेक येथे नाकाबंदी केली असता १२ चक्का ट्रक क्र. एम. एच.—४०/सी एस— ७६६५ चा चालक **आरोपी नामे— गणेश चुडामन वरवाडे वय ४१ वर्ष रा. वारेगाव, पो. बिना, ता. कामठी जि. नागपूर** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे ०५ ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १२ चक्का ट्रक क्र. एम. एच.—४०/सी एस— ७६६५ किंमती २०,००,०००/—रु मध्ये ०५ ब्रास रेती प्रती ब्रास ३०००/—रु प्रमाणे १५०००/—रु असा एकूण २०,१५,०००/—रु चा मुद्देमाल जप्त करून **चालक आरोपी नामे— गणेश चुडामन वरवाडे, वय ४१ वर्ष रा. वारेगाव, पो. बिना, ता. कामठी जि. नागपूर** यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३७९ भादंवि., सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोहवा परमेश्वर वाघमारे, पोना उमेश गाढवे, पोना अर्पितकुमार पसिने, पोशि विशाल चव्हाण पोशि लक्ष्मीकांत मुदनर यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर